# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**रविवार, दि.१५/०९/२०१९**

## “मौजे दस्तापूर: दोन कारचा अपघात.”

**<u>पोलीस ठाणे, मुरुम:</u>** कार क्र. के.ए. ३२ एन १६६२ च्या चालकाने निष्काळजीपणे चुकीच्या दिशेने कार चालवुन दि. १४.०९.२०१९ रोजी ०१.०० वा. सु. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वर मौजे दस्तापूर जवळ महेंद्रराज अंजय्या काकी रा. विनय नगार कॉलनी, सैद्राबाद, हैद्राबाद यांची कार क्र. टी.एस. ०८ ईके १२५९ ला धडक दिल्याने कार मधील महेंद्रराज काकी यांच्यासह त्यांची पत्नी शिल्पा, दोन मुले भिशुल व मिलींदराज, सासु शालीनी, हे गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या महेंद्रराज काकी यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) वरील कार क्र. के.ए. ३२ एन १६६२ च्या अज्ञात चालकाविरुध्द पोलीस ठाणे, मुरुम येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. १५.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “लोहारा: भुखंडाच्या कारणावरुन मारहान.”

**<u>पोलीस ठाणे, लोहारा:</u>** १) सुभाष बिराजदार २) राम बिराजदार व दोघांच्या पत्नी सर्व रा. लोहारा यांनी दि. १३.०९.२०१९ रोजी १३.०० वा. सु. कुसूम रामदास पोतदार रा. लोहारा यांच्या घरी येउन “तु राहत असलेली जागा आमची आहे.” असे म्हणुन कुसूम पोतदार व त्यांचा मुलगा प्रदिप यांना शिवीगाळ करुन लाथा-बुक्कयांनी, लोखंडी सळईने मारहान केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या कुसूम पोतदार यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, लोहारा येथे भा.दं.वि. कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “अवैध मद्य विक्री विरुध्द २ कारवाया”

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद(ग्रामीण) :</u>** दि. १४.०९.२०१९ रोजी १७.०० वा.सु. ऋषभनाथ जैन रा. किनी, ता.जि. उस्मानाबाद हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे उपळा शिवारात देशी-विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. १,०४४/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.) यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.) येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, उस्मानाबाद(ग्रामीण) :</u>** दि. १४.०९.२०१९ रोजी १६.१५ वा.सु. १) प्रमोद वाल्मीक लोंढे २) विश्वास तानाजी कदम दोघे रा. कारी, ता.बार्शी हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. २०,१९० रु. व मोटारसायकल क्र. एम.एच. १३ एए ८४६५ किं.अं. २०,०००/- रु. वरुन घेउन जात असतांना मौजे घाटंग्री शिवारात एकुण ४१,१९०/- रु. च्या मालासह स्थानिक गुन्हे शाखा, उस्मानाबाद यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.) येथे म.दा.का. कलम ६५ (ई), ८१, ८३ प्रमाणे गुन्हा दि. १४.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: १०२ कारवाया.”**

**<u>उस्मानाबाद जिल्हा:</u>** दि. १४/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १०२ कारवाया केल्या असुन त्यातुन २४,३०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

म.पोलीस उपनिरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद